माहे मार्च २०१९ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे २७५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम...

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१९/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी २०१९

प्रति,
जिल्हाधिकारी *(सर्व),*
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :- माहे मार्च २०१९ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे २७५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम...**

संदर्भ :- १.राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २७/११/२०१८ व दि.०७/१२/२०१८ चे पत्र
२. उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.ईएलआर-२०१८/प्र.क्र.४१५/१८/३३, दि.०२ जानेवारी, २०१९

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची असल्याने, आयोगाने माहे मार्च २०१९ ते मे २०१९ या कालावधीत मुदती संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे ८०६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व थेट निवडणुकीव्दारे भरण्यात येणा-या सरपंच पदाच्या रिक्त पदांसह रिक्त सदस्य पदांच्या पोटनिवडणूका घेण्यासाठी आयोगाच्या दिनांक ०६/११/२०१८ च्या अधिसूचनेन्वये मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक ०१/०९/२०१८ हा अधिसूचित करण्यात आला होता.

२. या निवडणूकांसाठी दिनांक ०१/०१/२०१९ हा अर्हता दिनांक असलेली विधानसभा मतदार यादी वापरण्याचा आयोगाचा मानस असल्यामुळे उक्त संदर्भ क्र.१ येथील दिनांक २७/११/२०१८ च्या पत्रान्वये देण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या दिनांक ०७/१२/२०१८ च्या पत्रान्वये पुढे ढकलण्यात आला.

३. उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. २ येथील दि.०२ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये दिनांक ०१ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यासाठी दिनांक ११/०१/२०१९ निर्धारीत केला असल्याचे कळविले आहे. सबब माहे मार्च २०१९ ते मे २०१९ या कालावधीत मुदती संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे ८०६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व थेट निवडणुकीव्दारे भरण्यात येणा-या सरपंच पदाच्या रिक्त पदांसह रिक्त सदस्य पदांच्या

पोटनिवडणूका घेण्यासाठी **मंगळवार दिनांक ०१ जानेवारी, २०१९ हा अर्हता दिनांक ग्राहय धरुन दिनांक ११ जानेवारी २०१९ रोजी अस्तित्वात येणारी** महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी वापरण्याचे दिनांक ०९/०१/२०१९ रोजी अधिसूचित करण्यात आले आहे.

४. माहे मार्च २०१९ ते मे २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या ग्रामपंचायतींपैकी **माहे मार्च २०१९ मध्ये मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे २७५ ग्रामपंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम माहे फेब्रुवारी २०१९ अखेर पर्यंत पार पाडणे क्रमप्राप्त असल्याने फक्त मार्च २०१९ मध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतींसाठी मतदार यादीचा कार्यक्रम प्राध्यान्याने पार पाडणे आवश्यक ठरते. या बाबी लक्षात घेता सदर निवडणूकांसाठी संगणकीकृत पध्दतीने मुद्दा क्र. ६ नुसार प्रभागनिहाय सुधारीत मतदार यादीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.**

## आदेश

५. **मतदार यादी कार्यक्रमाची व्याप्ती** – माहे मार्च २०१९ मध्ये मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे २७५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दिनांक ०१/०१/२०१९ हा अर्हता दिनांक असलेली दिनांक ११/०१/२०१९ रोजी प्रसिध्द होणारी महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी वापरण्यात यावी.

६. वरील मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील .

**मतदान यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक मंगळवार दि.०१.०१.२०१९**

| | | |
|---|---|---|
| १) प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार | दि.२१/०१/२०१९ |
| २) हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | सोमवार<br>बुधवार | दि.२१/०१/२०१९ ते<br>दि. २३/०१/२०१९ पर्यंत |
| ३) प्रभागनिहाय मतदार यादीची नोटीस जाहीर अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | शुक्रवार | दि. २५/०१/२०१९ |

७. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे –**

प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी.

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींचा समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या अधिक त्या ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे (म्हणजेच संबंधित ग्रामपंचायतींतील विधानसभेच्या मतदार यादीत समाविष्ट असलेले सर्व मतदार त्या ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांसाठीच्या प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत तसेच, संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीबाहेरील मतदार त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत) याची खात्री करावी.

आ) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र. मनपा/रानिआ२००७/ प्र.क्र.०६/का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

इ) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्रमांक - रानिआ/ मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दि. ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ई) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यांमधील दुरूस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दि.१७/०४/२०१५ चे आदेश)

**८. प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे.**

प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार/नागरीकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारुप मतदार यादीला दि.२१/०१/२०१९ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी .

**९. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे.**

९.१ दि.२१/०१/२०१९ ते दि.२३/०१/२०१९ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करून प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त पुढीलप्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करता येईल:-

i) लेखनिकांच्या काही चुका

ii) दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार

iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करणे.

९.२ सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर वरीलप्रमाणे विचार करून त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात ,जेणेकरून पुढील काळात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत.

**१०. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे:**

अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना दिनांक २५/०१/२०१९ रोजी मुद्दा क्र.११ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

११. प्रारूप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

अ) ग्रामपंचायत, तलाठी सजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील सूचना फलकावर

ब) स्थानिक वृत्तपत्रे

क) स्थानिक टेबल टि. व्ही.

१२.   वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या **मतदार यादीचे ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.** (संदर्भ: शासनाच्या महसूल व वन विभागाचे दि.२४/०४/२०१७ रोजीचे परिपत्रक)

१३.   मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींबाबत न्यायालयाने अथवा **अनर्हते विरोधातील अपिलासंदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास** त्या ठिकाणचा मतदार यादी कार्यक्रम रद्द करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१४.   मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्ह्याच्या मुख्य **कार्यकारी अधिकारी व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा.** आपल्या कामाचा काढावा मा. आयुक्त यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी घेण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

१५.   मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१६.   सदर **प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

Anarwade

(आरती सरवदे)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत: परिशिष्ट

**प्रत:-**

१. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता घ्यावी.**

४. संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

५. कक्ष अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

७. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

८. निवड नस्ती.

(परिशिष्ट)

*आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१९/का-८, दि.१० जानेवारी २०१९ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.*

माहे मार्च २०१९ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम...

## मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक ०१/०१/२०१९

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय **प्रारूप मतदार यादी** प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार दि.२१/०१/२०१९ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | सोमवार दि.२१/०१/२०१९ ते<br>बुधवार दि.२३/०१/२०१९ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय मतदार यादीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे. | शुक्रवार दि. २५/०१/२०१९ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

Sarwade

(आरती सरवदे)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्र: रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१९/का.०८**
**नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :- ०९/०१/२०१९**

**विषय** - माहे मार्च २०१९ ते मे २०१९ या कालावधीत मध्ये मुदत संपणा-या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच थेट निवडणुकीव्दारे भरण्यात यावयाच्या सरपंच पदांच्या रिक्त पदांसह रिक्त सदस्य पदांच्या पोटनिवडणुकांकरीता मतदार यादी ग्राहय धरण्याचा सुधारीत दिनांक अधिसूचित करण्याबाबत....

**संदर्भ** - महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १०-अ व १२ चे पोटकलम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगास प्रदान करण्यात आलेले अधिकार

**आदेश**

उपरोक्त संदर्भांकित अधिकारांचा वापर करुन विषयांकित निवडणूकांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकांच्या दिनांक ०६/११/२०१८ च्या अधिसूचनेन्वये शनिवार ०१/०९/२०१८ हा दिनांक मतदार यादी ग्राहय धरण्यासाठी अधिसूचित करण्यात आला होता.

२. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दि. ०२/०१/२०१९ च्या पत्रान्वये दिनांक ०१ जानेवारी,२०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत विधानसभेच्या अंतिम मतदार यादया प्रसिध्द करण्यासाठी ११ जानेवारी,२०१९ हा दिनांक भारत निवडणूक आयोगाकडून निर्धारीत केल्याचे आयोगास कळविले आहे. हे ध्यानात घेता नवीन नोंदणी झालेले मतदार मतदानापासून वंचित राहू नये तसेच उक्त कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता दिनांक ११/०१/२०१९ हा विधानसभेची मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक अधिसूचित करुन मतदार यादीसह प्रत्यक्ष निवडणूकीचा कार्यक्रम विहित मुदतीत पार पाडणे शक्य आहे.

३. वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, समक्रमांकाच्या दिनांक ०६/११/२०१८ च्या आदेशान्वये अधिसूचित केलेली अधिसूचना रद्द करुन उपरोक्त विषयांकित निवडणुकांकरीता **मंगळवार दिनांक ०१ जानेवारी, २०१९ हा अर्हता दिनांक ग्राहय धरुन दिनांक ११ जानेवारी २०१९ रोजी अस्तित्वात येणारी** महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, या अधिनियमांतर्गत प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येईल, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग,यांच्या आदेशानुसार

आपला,

( किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र